ePaper

तुर्कीच्या आर्थिक नाड्या आवळण्यात आल्या, बहिष्कारानंतर भारताचा निर्णय

वर्ष - 8 । अंक - 281 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 16 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




## आतील पानांत


- कारागृहात रंगला क्रिकेटचा थरार!
- गुजरात टायटन्सला मोठा धक्का
- पाकिस्तान जिथे, तेथे भिकाऱ्यांची रांग
- भीतीपोटीच जनगणनेस मान्यता


## सरन्यायाधीशांची काल शपथ, आज निकाल

# नारायण राणेंना 'सर्वोच्च' झटका!

## पहिल्याच निर्णयात नारायण राणेंना झटका, मिलीभगत पाहून खडसावलं

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**देशाचे 52 वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतल्यानंतर भूषण गवई यांनी पहिलाच निकाल महाराष्ट्रातील प्रकणावर दिला आहे. विशेष म्हणजे तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणेंना दणका देत सरन्यायाधीशांनी 30 वर्षांपूर्वीच्या खटल्यात महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. सन 1998 साली युती शासनाच्या काळात नारायण राणे हे महसूल मंत्री असताना वन विभागाची 30 एकर जमीन बिल्डरला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी राणेंनी घेतलेला हा निर्णय रद्द केला आहे. तसेच, पुण्यातील (PUNE) ती जमीन पुन्हा वन विभागाला देण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्यामुळे, सरन्यायाधीशांच्या पहिल्याच निर्णयात भाजप खासदार आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणेंना दणका बसला आहे.**

भारताचे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांनी पहिला निकाल दिला, तो पुण्यातील वन विभागाच्या जमिनीशी संबंधीत आहे. वन विभागाची पुण्यातील 30 एकर जागा बिल्डरला देण्याचा निर्णय म्हणजे राजकारणी, प्रशासकीय अधिकारी खासगी बिल्डरसोबत कसे काम करतात याचं ढळढळीत उदाहरण आहे, असेही भूषण गवई यांनी या निर्णयात म्हटलं आहे. वन विभागाची पुण्यातील कोंढवा भागातील शेकडो कोटी रुपयांची 30 एकर जागा रिची रिच सोसायटीसाठी बिल्डरला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी पुरातत्व खात्याच्या रेकॉर्ड्समध्ये फेरफार करण्यात आले होते. हे सगळं उघडकीस आल्यानंतर या जागेबाबतचे सर्व निर्णय बेकायदेशीर ठरवून ही जागा वन विभागाला परत देण्याचा निर्णय सरन्यायाधीश गवई यांनी दिला आहे.

### देशातील सर्वच राज्यांना आदेश

भुषण गवई यांच्यासह तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने पुण्यातील 30 एकर जागा वन विभागाला परत देताना संपूर्ण देशात ज्याचा दूरगामी परिणाम होईल असा निर्णय दिलाय. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन त्यांच्या राज्यात अशाप्रकारे वन विभागाच्या जमीनी हडप केल्या गेल्या असतील तर त्याचा तपास करण्याचे आदेश दिले आहेत. या जमीनी 1 वर्षाच्या आत पुन्हा सरकारजमा करुन घेण्यात याव्यात असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलंय जर जमिनीवर बांधकाम उभे राहिल्याने जमीन परत घेणं शक्य नसेल तर बाजारभावाप्रमाणे मोबदला वसुल केला जावा, असेही सर्वोच्च न्यायालय म्हटलं आहे.



**पुण्यातील 30 एकर जमीन वन विभागाला परत देण्याचे आदेश**

### काय आहे हे संपूर्ण प्रकरण

- पुण्याच्या कोंढवा भागातील 30 एकर जागा वन विभागाची असताना देखील ती चव्हाण नावाच्या व्यक्तिला देण्याचा निर्णय नारायण राणे यांनी 1998 साली महसूल मंत्री या नात्याने घेतला होता. ही 30 एकर जागा आपली शेतजमीन असल्याचा दावा चव्हाण नावाच्या व्यक्तिने केला होता. मात्र जमीन ताब्यात येताच चव्हाण नावाच्या व्यक्तिने ही जागा रिची रीच सहकारी संस्थेला दोन कोटींना विकली विकली.
- आश्चर्य पुढच्या काही दिवसांमध्ये त्यावेळचे पुण्याचे विभागीय आयुक्त राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी विजय माथनकर आणि उपवन संरक्षक अशोक खडसे यांनी ही जागा बिगर शेती असल्याचे प्रमाणपत्र दिले. ज्यामुळे या जागेवर बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा झाला.
- रिची रिच सोसायटी या जागेत 1550 फ्लॅट्स , तीन क्लब हाउसेस आणि 30 रो हाऊसेस आणि शॉपिंग कॉम्प्लेक्सचा समावेश असलेला भव्य प्रकल्प उभारणार होतं .
- सिटी ग्रुपचे अनिरुद्ध देशपांडे , ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज आणि रहेजा बिल्डर्स यांनी एकत्र येऊन रिची रिच सोसायटी स्थापनं केली होती .
- मात्र या निर्णयाच्या विरोधात पुण्यातील सजग चेतना मंचने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. पुण्याच्या मध्यवर्ती भागातील वनजमीन बिल्डरला दिली गेल्याने पुण्याच्या पर्यावरणावर त्याचा परिणाम होणार असल्याचा दावा याचिकेतून करण्यात आला आहे.

### राणेंकडून केंद्राची परवानी न घेताच परस्पर निर्णय

ही 30 एकर जागा आपली शेतमीन असल्याचा दावा चव्हाण यांनी केला होता. हे प्रकरण तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणे यांच्याकडे गेले होते. राणे यांनी केंद्रीय पर्यावरण विभागाची परवानगी न घेताच जमीन चव्हाण यांना देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे ही जमीन चव्हाण नावाच्या व्यक्तीकडे आली. जमिनाचा ताबा मिळताच चव्हाण यांनी ही जागा रिची रीच गृहनिर्माण संस्थेला दोन कोटींना विकली. बाजारभावानुसार या जमिनीची किंमत तब्बल एक हजार कोटी इतकी आहे. पुण्यातील सिटी ग्रुपचे अनिरुद्ध देशपांडे , ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज आणि रहेजा बिल्डर्स यांनी एकत्र येऊन रिची रिच सोसायटी स्थापना केली होती. या जागेच पंधराशे प्लॅटस, तीन क्लब हाउसे, शॉपिंग कॉम्प्लेक्स असा भव्य प्रोजेक्ट उभारण्यात येणार होता.

### ब्रिटिशकालीन रेकॉर्डमध्ये छेडछाड !

त्यावेळी पुरातत्व विभागाच्या रेकॉर्डमध्ये फेरफार केल्याचे आढळून आले. या जमिनींबाबतचे जे ब्रिटिशकालीन रेकॉर्ड होते त्या रेकॉर्डचे शेवटचे अर्ध पान कोरे आढळून आले. तर अर्धापानावर नव्याने मजकूर छापल्याच आढळून आले. सर्वोच्च न्यायालयाची दिशाभूल करण्यासाठी हा बनाव रचण्यात आला होता. गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात हे प्रकरण सीआयडीकडे सोपविण्यात आले. हे सर्व वनविभागाकडून न्यायालयाच्या निदर्शनात आणून दिले. अखेर वन विभाग विरुद्ध रिची रिच सोसायटी यांच्या खटल्याचा निकाल गवई यांना देताना ही जागा वनविभागाचा परत देण्याचा निर्णय घेतला आहे. ही संपूर्ण वाटप व विक्री पूर्णतः बेकायदेशीर होती. 2007 मध्ये दिलेली पर्यावरण मंजुरी रद्द करण्यात आली. राज्य महसूल विभाग, वन विभाग, व अधिकाऱ्यांची जबाबदारी ठरवली.जमीन तीन महिन्यांत वनविभागाकडे परत द्यावी, असा आदेश दिला आहे.

# महापालिकेला सहन करावा लागणार भुर्दंड?

## पालिकेकडे ठेकेदाराची 79 कोटींची नुकसानभरपाईची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाहतूककोंडी सोडविण्यासाठी शिवणे ते खराडी हा नदीपात्रातून रस्ता तयार करण्याचे काम महापालिकेने सुरू केले होते. यासाठी २०११ मध्ये निविदा प्रक्रिया करून ३५० कोटी रुपयांच्या कामाला मान्यता दिली होती. मात्र, या रस्त्यासाठी आवश्यक ते भूसंपादन न झाल्याने रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने महापालिकेकडे ७९ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मागितली आहे.**



जोरदार प्रयत्न केले जात असून, याला मान्यता मिळाल्यास हा भुर्दंड महापालिकेला सहन करावा लागणार आहे.हा रस्ता अनेक ठिकाणी निळ्या पूररेषेत आला आहे. तर, काही ठिकाणी जागा मालकांनी आपल्या इतर जागेवरील आरक्षणे उठवून देण्याची मागणी महापालिकेकडे केली. त्यामुळे १४ वर्षांनंतरही या रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे चार वर्षांपूर्वी २०२१ मध्ये रस्त्याचे काम घेतलेल्या ठेकेदाराने काम करण्यास असमर्थता दाखवून महापालिकेकडून आतापर्यंत केलेल्या कामाचे अंतिम बिलदेखील घेतले. तसेच, महापालिकेने भूसंपादन करून न दिल्याने या कामात आर्थिक नुकसान झाल्याचे सांगून ठेकेदाराने महापालिकडे नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यास सुरुवात केली आहे.नुकसान भरपाईपोटी ७९ कोटी रुपयांचा दावा संबधित ठेकेदाराने महापालिकेकडे केला आहे. हे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी महापालिकेत जोरदार प्रयत्न सुरू झाले आहेत. या दाव्यासाठी जानेवारी २०२५ मध्येच लवादाची नेमणूक करून त्यांना कार्यदिश देण्यात आलेला आहे. आता लवादासाठी महापालिका आणि संबंधित ठेकेदार यांच्यात करार करण्याचा प्रस्तावही स्थायी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे.रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून नुकसानभरपाई मागण्यात आली आहे. मात्र, ती देण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. लवादाने नुकसानभरपाई द्यावी, असा निर्णय दिला, तरी तो निर्णय महापालिकेला बंधनकारक नाही. पालिकेचे नुकसान होत असल्यास ठेकेदाराला पैसे दिले जाणार नाहीत.हा प्रस्ताव मान्य व्हावा, यासाठी जोरदार प्रयत्न केले जात असून, याला मान्यता मिळाल्यास हा भुर्दंड महापालिकेला सहन करावा लागणार आहे.हा रस्ता अनेक ठिकाणी निळ्या पूररेषेत आला आहे. जागा मालकांनी आपल्या इतर जागेवरील आरक्षणे उठवून देण्याची मागणी महापालिकेकडे केली. त्यामुळे १४ वर्षांनंतरही या रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे चार वर्षांपूर्वी २०२१ मध्ये रस्त्याचे काम घेतलेल्या ठेकेदाराने काम करण्यास असमर्थता दाखवून महापालिकेकडून आतापर्यंत केलेल्या कामाचे अंतिम बिलदेखील घेतले.

### ठेकेदाराला पैसे दिले जाणार नाहीत

तसेच, महापालिकेने भूसंपादन करून न दिल्याने या कामात आर्थिक नुकसान झाल्याचे सांगून ठेकेदाराने महापालिकडे नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यास सुरुवात केली आहे. नुकसान भरपाईपोटी ७९ कोटी रुपयांचा दावा संबधित ठेकेदाराने महापालिकेकडे केला आहे. हे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी महापालिकेत जोरदार प्रयत्न सुरू झाले आहेत. या दाव्यासाठी जानेवारी २०२५ मध्येच लवादाची नेमणूक करून त्यांना कार्यदिश देण्यात आलेला आहे. आता लवादासाठी महापालिका आणि संबंधित ठेकेदार यांच्यात करार करण्याचा प्रस्तावही स्थायी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे.रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून नुकसानभरपाई मागण्यात आली आहे.

# शिवाजीनगर मुख्यालयात हजर राहा

## डीएसकेतील गुंतवणूकदारांना आर्थिक गुन्हे शाखेचे आवाहन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केलेल्या बांधकाम व्यावसायिक दीपक सखाराम कुलकर्णी (डीएसके) यांच्या कार्यालयातून जप्त केलेली कागदपत्रे तसेच गुंतवणुकीसंबंधाची माहिती, कागदपत्रे, ठेवीदारांची यादी याच्यासह अल्प मुदत कर्जधारकांची यादी आहे. यामध्ये आर्थिक गुन्हे शाखेला त्रुटी आढळून आल्या असून, ही यादी न्यायालयात सादर करण्यापूर्वी त्यामधील त्रुटी दुरुस्ती करण्याचे नियोजन आर्थिक गुन्हे शाखेने केले आहे. गुंतवणूकदारांनी २९ मेपर्यंत दररोज कागदपत्रे सादर करावीत.**



सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहापर्यंत कागदपत्रे स्वीकारण्यात येणार आहे,' अशी माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने देण्यात आली.आर्थिक गुन्हे शाखेने 'ए' सूचीमध्ये डी. एस. कुलकर्णी यांच्या कार्यालयातील संगणकातून प्राप्त केलेली ठेवीदारांची यादी केली आहे, तर 'बी' सूचीमध्ये आर्थिक गुन्हे शाखेकडे गुंतवणुकीसंबंधीची माहिती व कागदपत्रे यांसह ठेवीदारांची यादी आहे. 'सी' सूचीमध्ये अल्प मुदतीच्या कर्जदारांची यादी आहे.यादीमध्ये काही ठेवीदारांनी ठेवीच्या पावत्या, स्वतःच्या बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश, आधारकार्ड फोटोकॉपी सादर केलेली नाही. तर, काही ठेवीदारांची ठेव रक्कम चुकीची नोंद झालेली आहे. ज्यांचे नाव दोन यादीमध्ये नाही आणि डीएसके एमपीआयडी फिक्स डिपॉझिट होल्डर यादीमध्ये आहे; त्यांनी २ ते ७ जूनपर्यंत येऊन कागदपत्रे दाखल करावीत.यादीमध्ये काही ठेवीदारांनी ठेवीच्या पावत्या, स्वतःच्या बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश, आधारकार्ड फोटोकॉपी सादर केलेली नाही. तर, काही ठेवीदारांची ठेव रक्कम चुकीची नोंद झालेली आहे. ज्यांचे नाव दोन यादीमध्ये नाही आणि डीएसके एमपीआयडी फिक्स डिपॉझिट होल्डर यादीमध्ये आहे; त्यांनी २ ते ७ जूनपर्यंत येऊन कागदपत्रे दाखल करावीत. डीएसकेडीएल ही पब्लिक लिमिटेड कंपनी आहे. यामधील मुदत ठेवी ज्या गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केल्या आहेत त्यांची नावे एनसीएलटी न्यायालयाकडे पाठविण्यात आलेली असल्याने त्यांची माहिती स्वीकारली जाणार नाही. 'ए' सूचीचा आधार घेऊन 'बी' आणि 'सी' या सूचीमध्ये दुरुस्ती करण्यात येणार आहे. दुरुस्त्या केलेली अंतिम यादी २० जूननंतर न्यायालयात सादर केली जाईल, अशी माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या सहायक पोलीस आयुक्तांनी दिली.शिवाजीनगर येथील मुख्यालयात सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहापर्यंत कागदपत्रे स्वीकारण्यात येणार आहे,' अशी माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने देण्यात आली. आर्थिक गुन्हे शाखेने 'ए' सूचीमध्ये डी. एस. कुलकर्णी यांच्या कार्यालयातील संगणकातून प्राप्त केलेली ठेवीदारांची यादी केली.

### अल्प मुदतीच्या कर्जदारांची यादी

आहे, तर 'बी' सूचीमध्ये आर्थिक गुन्हे शाखेकडे गुंतवणुकीसंबंधीची माहिती व कागदपत्रे यांसह ठेवीदारांची यादी आहे. 'सी' सूचीमध्ये अल्प मुदतीच्या कर्जदारांची यादी आहे.यादीमध्ये काही ठेवीदारांनी ठेवीच्या पावत्या, स्वतःच्या बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश, आधारकार्ड फोटोकॉपी सादर केलेली नाही. तर, काही ठेवीदारांची ठेव रक्कम चुकीची नोंद झालेली आहे.

# चिखली-कुदळवाडीची टीपी स्कीम रद्द!

# भूमिपुत्रांच्या एकजुटीचा विजय!

## महानगरपालिका सर्वसाधारण सभेत प्रस्तावाला मंजुरी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने मौजे चिखली- कुदळवाडीतील प्रस्तावित TP स्किम कार्यवाही रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत प्रशासनाने महापालिका सर्वसाधारण सभेत मंजुरी दिली. त्यामुळे भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश मिळाले असून, ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांना दिलासा मिळाला आहे.**

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश



चिखली, चऱ्होली येथील प्रस्तावित 'टीपी स्कीम' बाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक केली होती. त्यावेळी प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. आज दि. 15 मे 2025 रोजी प्रशासनाने सर्वसाधारण सभेत सभेला मान्यता दिली आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या भूमिपुत्रांच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे या भागात टीपी स्कीम लागू नये, अशी आग्रही भूमिका प्रशासनासमोर मांडली. त्याला यश मिळाले आहे.

**चऱ्होलीबाबत भूमिपुत्रांसाठी लढणार!**

मौजे चिखलीतील प्रस्तावित TP Scheme प्रशासनाने रद्द केली. मात्र, अद्याप मौजे चऱ्होलीतील प्रस्तावित TP Scheme बाबत निर्णय झालेला नाही. याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह ग्रामस्थ, भूमिपुत्र यांची बाजू ऐकूण घेणार आहेत.

त्यासाठी आयुक्त- ग्रामस्थ यांची श्री वाघेश्वर महाराज मंदिरात लवकरच बैठक घेण्यात येईल. भूमिपुत्रांचा TP Scheme ला का विरोध आहे? याबाबत सर्वसमावेशक चर्चा करण्यात येईल. स्थानिक नागरिकांना विश्वासात घेवूनच निर्णय घेण्यात येईल, अशी प्रशासनाची भूमिका आहे. मात्र, चऱ्होलीची TP Scheme सुद्धा चिखली-कुदळवाडीप्रमाणे रद्द करावी, अशी आमची ठाम मागणी आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> “ चिखली-कुदळवाडीचा TP Scheme रद्द करण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांचे आभार व्यक्त करतो. याबाबत सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. याच धर्तीवर आता चऱ्होलीची TP Scheme संदर्भातील प्रक्रियाही रद्द करावी. कारण, भूमिपुत्रांचा या स्कीमला विरोध आहे. संपूर्ण शहराचा सुधारित विकास आराखडा (DP) आगामी तीन महिन्यांत अंतिम होईल. त्यामुळे चऱ्होलीसाठी नवीन TP Scheme आवश्यकता नाही, अशी माझी भूमिका आहे. लोकप्रतिनिधी म्हणून स्थानिक, जागामालक, ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी मी कटिबद्ध आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळणार 'शैक्षणिक किट'

## 'ई-रुपी' प्लॅटफॉर्मद्वारे वितरण, पिंपरी चिंचवड महापालिकेचा उपक्रम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसांपासूनच म्हणजेच १५ जून २०२५ पासूनच शैक्षणिक साहित्यांचा समावेश असणारे एक किट देण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला आहे.**

विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना शैक्षणिक साहित्याचा अभाव असल्यामुळे अडचण येऊ नये, यासाठी लवकरात लवकर शैक्षणिक किटचे वितरण पूर्ण व्हावे, याद्दष्टीने महानगरपालिका प्रशासनाने नियोजन केले आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक किट वितरण प्रक्रिया ई-रुपी (e-Rupi) या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे पूर्ण केली जाणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेट लाभ हस्तांतरण (DBT) उपक्रमांतर्गत ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. ज्यामध्ये ई-रुपी डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे सुरक्षित, रोखविरहित व्यवहार करून विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविले जाते. या किटमध्ये यंदा पालक आणि शाळांकडून मिळालेल्या अभिप्रायाचा विचार करून काही नवीन वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे. नामांकित कंपन्यांच्या शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक असणाऱ्या वस्तू या किटमध्ये आहेत. मागील वर्षी ई-रुपी प्रणाली अंतर्गत ५१ हजार २०३ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले होते. तर, यावर्षी बालवाडी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.



### अशी आहे ई-रुपी प्रक्रिया


- ई-रुपी हे एक डिजिटल व्हाउचर असून यासाठी बँक खाते आवश्यक नाही
- यामध्ये लाभार्थ्यांना एसएमएस द्वारे प्री-पेड क्युआर कोड व्हाउचर प्राप्त होते
- हे व्हाउचर केवळ शाळा साहित्य खरेदीसाठीच वापरता येते
- यासाठी फक्त १० अंकी वैध संपर्क क्रमांक आवश्यक
- अतिरिक्त सुरक्षेसाठी ओटीपी द्वारे व्यवहार पडताळणी होते

> “ थेट लाभ हस्तांतरण योजनेंतर्गत शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवसांपासूनच शैक्षणिक किटचे वितरण सुरू केले जाईल. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची समान संधी देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. डीबीटी यंत्रणेत सुधारणा करून आणि किटमध्ये उपयुक्त वस्तूंचा समावेश करून विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी सक्षम बनवण्यासाठी आमचे प्राधान्य आहे.
>
> **- शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> “ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ई-रुपी आधारित डीबीटी प्रक्रियेद्वारे शैक्षणिक किटचे वाटप करण्यात येईल. विद्यार्थ्यांपर्यंत जलद, पारदर्शकपणे लाभ पोहोचवण्यासाठी ई-रुपी डीबीटी मॉडेल उपयुक्त ठरत आहे. यावर्षीच्या सुधारित प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या गरजा लक्षात घेऊन प्रक्रिया आणखी प्रभावी करण्यात आली आहे.
>
> **-प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> “ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्याद्दष्टिने यावर्षी आम्ही डीबीटी प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण तांत्रिक सुधारणा केल्या आहेत. ज्यामुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. या प्रक्रियेद्वारे करण्यात येणाऱ्या प्रत्येक किटचे वाटप ओटीपी पडताळणीद्वारे सुरक्षित, जलद पद्धतीने होणार आहे.
>
> **-विजयकुमार थोरात,** सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सर्वांशी प्रेमाने वागावे

ज्याला चार पैसे शिल्लक टाकावेत असे वाटत असेल त्याने पहिली कोणती गोष्ट करायची ती ही की, कोणाचेही कर्ज होऊ देऊ नये. हे साधले की मग, खर्च थोडा कमी करण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे सहजच शिल्लक पडू लागते. तोच नियम प्रेमाला लागू असतो. प्रेम वाढावे असे वाटत असेल तर प्रथम द्वेषबुद्धीला मूठमाती देणे जरूर आहे. नंतर, प्रेम कसे वाढेल याच्या उद्योगाला लागावे. चुकूनसुद्धा कोणाचे मन दुखवणार नाही अशी दक्षता घेणे जरूर आहे. एखाद्याला काठी मारली किंवा अन्य तऱ्हेने देहाला दुखापत केली, तर ती थोड्याफार वेळाने भरून निघेल, आणि त्याच्या हातापाया पडून माफी मागितली तर तो मनुष्य क्षमाही करील; पण मन दुखविण्याइतकी वाईट गोष्ट दुसरी नाही. मन दुखविणे म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराला दुखविण्यासारखे आहे; कारण, भगवंताने ज्या आपल्या विभूती सांगितलेल्या आहेत त्यांत 'मी मन आहे' असे सांगितले आहे. सत्याचे व्रत चांगले आहे हे खरे, पण सारासार विचार प्रत्येक ठिकाणी अवश्य लागतो. एखादा मनुष्य जर असे म्हणाला की, मी एक सत्य तेवढेच जाणतो, आणि सत्य बोलताना आई, बाप, माणसे, देव, गुरू वगैरे कुणालाच ओळखत नाही, तर त्याला काय म्हणावे ? एक सत्य पाळण्याच्या नावाखाली जर असल्या पूज्य विभूतींचे अवमान करण्याचे दहा गुन्हे होत असतील, तर त्या सत्याला चांगले तरी कसे म्हणावे ? चोरी करण्याकरिता आालेल्या चोराला, त्याला चोरी करू दिली नाही तर त्याचे मन दुखावेल म्हणून चोरी करू देणे हे योग्य म्हणता येईल का ? सारांश, प्रत्येक गोष्टीत सारासार विचाराची गरज आहे. समजा, एका बापाला चार मुलगे आहेत; त्या चारांपैकी एकाला गोड आवडते, दुसऱ्याला आंबट आवडते, तिसऱ्याला तिखट आवडते, आणि चौथ्याला तेलकट आवडते. आता प्रत्येकाच्या या रुचिवैचित्र्यामुळे जर ते भांडू लागले, तर भांडण कधीच मिटणार नाही. म्हणून भांडण मिटवायचे असेल, तर चौघांनीही एकमेकांच्या रुचीकडे दुर्लक्ष केले पाहिजे हे पहिले काम; आणि पुढे प्रेम वाढविण्याकरिता, ज्या एका बापाची आपण चार मुले आहोत, त्याच्याकडे दृष्टी ठेवणे हे दुसरे काम; म्हणजे साहजिकच पहिल्या गोष्टीचा विसर पडून, आपण सर्व बंधू आहोत ही एकच जाणीव डोळ्यांसमोर राहून प्रेमाचे पोषण होईल. कशाही परिस्थितीत एकमेकांशी सलोख्याने आणि प्रेमाने राहणे, या सारासार विचाराचे पालन प्रत्येक भावाने केले, तर कोणाचेही मन न दुखविता कुटुंबात समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होईल.

बोधवचन:- साधकाच्या घरात इतके प्रेम असावे की ते सोडून जाणाऱ्याला पुन्हा त्या वातावरणात आपण केव्हा येऊन पडतो असे झाले पाहिजे.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा, पाकव्याप्त काश्मीर लटकला!

**पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर आणि 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाल्यानंतर एकीकडे भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू असताना दुसरीकडे बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा करण्यात आली आहे. बलोच नेता मीर यार बलोच याने 'रिपब्लिक ऑफ बलुचिस्तान' ची घोषणा करत पाकिस्तानपासून स्वतंत्र झाल्याची घोषणा केली.**



### पाकव्याप्त काश्मीरवर ताबा घ्या !

साहजिकच प्रत्येकाच्या मनात एक प्रश्न येतो की आता पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानच्या ताब्यातून आपण काढून घेणार का ? खचलेल्या पाकिस्तानवर दबाव आणून पाकव्याप्त काश्मीर आपण मुक्त करू शकणार नाही का? आणि प्रत्येक जण हेच म्हणत आहे की हीच वेळ आहे, पाक व्याप्त काश्मीरवर ताबा घेण्याची !

### कोण हा मीर यार बलोच ?

मीर यार बलोच हा एक लेखक आणि स्वतंत्र बलुचिस्तानसाठी लढणाऱ्या बलोच लिबरेशन आर्मीचा नेता आहे. त्याने पाकिस्तानपासून बलुचिस्तान स्वातंत्र्य झाल्याचे घोषित केले. नवी दिल्लीमध्ये बलुचिस्तानचे स्वतंत्र उच्चायुक्त सुरू करण्यात यावे, अशी मागणी त्याने भारताकडे केली आहे. तसेच संयुक्त राष्ट्रांनी त्यांची शांती सेना ही बलुचिस्तानमध्ये पाठवावी आणि पाकिस्तानच्या सैन्याला त्यांच्या सीमेत पाठवावे, अशी मागणीही त्याने केली आहे.

### प्रश्न पाकव्याप्त काश्मीरचा..

भारताचे नौदल, लष्कर आणि हवाई दल हे सर्व शत्रूला धडा शिकवण्यात गुंतलेले आहेत. दरम्यान, भारतीय सैन्याच्या हल्ल्याने बिथरलेल्या पाकड्यांच्या तावडीतून पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्यावा आणि ते आपल्या ताब्यात घेण्याची हीच वेळ आहे, असे देशातील सर्व नागरिक एक सुरात म्हणत आहेत. त्यात पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओके हा भारताचा एक भाग आहे, ज्यावर पाकिस्तान जबरदस्तीने आपला दावा करत आहे, असा ही सूर सर्वत्र उमटला असताना युद्धाशिवाय पीओके परत घेता येणे शक्य आहे का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### पीओके ची दोन भागात विभागणी..

पीओके दोन भागात विभागला गेला आहे. त्यातील एक भाग गिलगिट आणि बाल्टिस्तान म्हणून ओळखला जातो. हा भूभाग ६४ हजार ८१७ किलोमीटर चौरस क्षेत्रावर पसरलेले आहे.. दुसरा भाग पीओकेचा आहे जो १३ हजार २९७ किलोमीटर चौरस क्षेत्रावर पसरला आहे. जेव्हा देश स्वतंत्र नव्हता, तेव्हा जम्मू आणि काश्मीरचा राजा हरीसिंह यांच्या ताब्यात हा भाग होता. जास्त करांमुळे मुस्लिमांनी त्याला विरोध करायला सुरुवात केली. त्या वेळी, राजा आणि प्रजा यांच्यातील संघर्षाचे एक प्रमुख कारण होते. कालांतराने जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा पाकिस्तानी लोकांना वाटले की काश्मीर त्यांचेच आहे.

### पाकिस्तानने कसा ताबा ठोकला ?

जेव्हा काश्मीरमध्ये विरोध वाढला आणि अनेकांनी तेथे प्रवेश केला, तेव्हा राजा हरीसिंह घाबरले आणि सरदार पटेल यांच्याकडे गेले. सरदार पटेल म्हणाले की, आमच्या सोबत या. आम्ही सैन्य पाठवू आणि पाकिस्तानींना हाकलून लावू. या प्रस्तावानंतर, राजा हरीसिंह यांनी 'इंस्टूमेंट ऑफ एक्सेशन' या करारावर स्वाक्षरी केली. त्यानंतर भारतीय सैन्याला पाकिस्तानातील लोकांना जम्मू आणि काश्मीरच्या सीमेपार हलवण्यात यश आले. तोपर्यंत पंडित जवाहरलाल नेहरू संयुक्त राष्ट्रांमध्ये पोहोचले होते. तेथे एक ठराव मंजूर करण्यात आला, ज्यामध्ये असे म्हटले होते, की प्रत्येकाने जिथे आहात तिथेच राहावे. पाकिस्तानने यावर सहमती दर्शवली होती, परंतु भारताने एक अट घातली, की जोपर्यंत पाकिस्तानी भारतीय भूमी सोडत नाहीत तोपर्यंत लोकांचे मत घेतले जाणार नाही.

### युद्धाशिवाय आता कोणता पर्याय?

भारत पीओके थेट परत घेऊ शकत नाही. कारण, हा एक गुंतागुंतीचा आंतरराष्ट्रीय वाद आहे, जो केवळ बळाच्या जोरावर सोडवता येत नाही. पीओके हा भारताचा अविभाज्य भाग आहे, परंतु पाकिस्तान तो आपल्या नियंत्रणाखाली ठेवतो. पीओके परत मिळवण्यासाठी युद्ध हा एकमेव पर्याय आहे. पण त्यामुळे दोन्ही देशांचे आर्थिक आणि सामाजिक नुकसान होईल. पीओकेच्या मुद्द्यावर संयुक्त राष्ट्र संघ मध्यस्थीची भूमिका बजावते.

### युद्ध शेवटचा मार्ग..

भारत आणि पाकिस्तानमधील हा प्रश्न सोडवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी अनेक वेळा प्रयत्न केले आहेत, परंतु अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. पीओके पाकिस्तानच्या ताब्यात आहे, त्यामुळे ते परत मिळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे युद्ध. पाकिस्तानने स्वतः परत केले तरच युद्धाशिवाय पीओके परत मिळवता येईल आणि पाकिस्तान कधीही ते करणार नाही. म्हणून युद्ध हाच एकमेव पर्याय आहे, असे वाटते. पंतप्रधान मोदी आणि त्यांचे सर्व सहकारी अत्यंत तल्लख बुद्धीचे आणि चाणाक्ष आहेत. पाकव्याप्त काश्मीर वर आज ना उद्या ते तोडगा काढणारच याची प्रत्येक भारतीयाला खात्री आहे. पाकव्याप्त काश्मीर हे भारताचे एक अंग होणार आहे, प्रश्न एवढाच आहे की कधी ? आणि या कधीचे उत्तर मिळत नाही, हे आपले दुर्दैव आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येणार?

## प्रकाश महाजन यांचे महत्त्वाचे भाष्य, संजय राऊत यांना सुनावले खडे बोल




।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोघं एकत्र येतील का? याविषयी एप्रिल महिन्यात चर्चा रंगल्या होत्या. या राजकीय नाट्याचा पुढचा अंक येण्याआधीच प्रकाश महाजन यांनी याबाबत महत्त्वाचं भाष्य केलं आहे. संजय राऊत यांना त्यांनी खडे बोल सुनावत एक आरोपी केला आहे.**

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अजूनही एकत्र येऊ शकतात का? असा थेट सवाल महेश मांजरेकर यांनी राज ठाकरे यांना विचारला. त्यावर राज ठाकरे म्हणाले, “कोणत्याही मोठ्या गोष्टींसमोर आमच्यातील वाद, भांडणं किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. मराठी माणसाच्या अस्तित्त्वासाठी या गोष्टी अत्यंत शुल्लक आहेत. एकत्र येणं, एकत्र राहणं यात फार कठीण गोष्ट वाटत नाही. विषय फक्त इच्छेचा आहे, कारण हा माझ्या एकट्याचा विषय नाही. माझं म्हणणं आहे की सर्व राजकीय पक्षातील सर्व मराठी माणसांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा.” असं राज ठाकरे म्हणाले होते. २० एप्रिलला ही मुलाखत समोर आली होती. त्यानंतर उद्धव ठाकरेंनीही सकारात्मक प्रतिसाद दिला होता. आता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का? यावर प्रकाश महाजन यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी या प्रश्नावर भाष्य केलं आहे. मला एका उर्दू गझलची ओळ आठवते आहे.

तू ने एक बात कही लाखो फसाने निकले. राज ठाकरेंनी महेश मांजरेकरांना मुलाखत देताना एक ते दोन वाक्यं बोलले. त्यावर लोकांनी स्वप्नं बघायला सुरुवात केली. संजय राऊतसारखे लोक तर आम्हाला त्यांचे बटिक समजू लागले आहेत. तुम्ही त्यांच्याशी बोलायचं नाही, त्यांच्याशी बोलायचं नाही. या आमच्या अटी आहेत, त्या अटी आहेत. खरं तर संजय राऊतला समजलं पाहिजे की राज ठाकरे हे कुठल्याही अटीत किंवा चौकटीत बसणारी व्यक्ती नाही. महाराष्ट्र द्रोही लोकांशी संबंध ठेवू नका म्हणत आहेत. ते ठरवणार कोण?” असा सवाल प्रकाश महाजन यांनी केला.संजय राऊत म्हणातात, तुम्ही अनैतिक संबंध ठेवू नका, ज्या संजय राऊतांनी चंचल स्वभावाच्या उद्धव ठाकरेंना राजकीय व्याभिचार करायला लावला. त्या संजय राऊतने आम्हाला नैतिक अनैतिकतेच्या गोष्टी सांगाव्या का? संजय राऊतने आम्हाला नैतिकता शिकवली पाहिजे का? राज ठाकरे जो निर्णय घेतील तो कार्यकर्ते मानतील. निर्णय राज ठाकरे घेतील. त्यांनी काय निर्णय घ्यायचा याचा सल्ला मी त्यांना जाहीरपणे देऊ शकत नाही. संजय राऊत ज्या पद्धतीने वक्तव्य करतात ती एकत्र येण्याची वक्तव्य आहेत का? दोन भाऊ ठरवतील की काय करायचं. काही वेळा अशा लोकांमुळेही संबंधात दुरावा येतो. जी गोष्ट जुळत आली वाटतं ती फिस्कटून जाऊ शकते” असं प्रकाश महाजन म्हणाले.उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अजूनही एकत्र येऊ शकतात का? असा थेट सवाल महेश मांजरेकर यांनी राज ठाकरे यांना विचारला. त्यावर राज ठाकरे म्हणाले, “कोणत्याही मोठ्या गोष्टींसमोर आमच्यातील वाद, भांडणं किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. मराठी माणसाच्या अस्तित्त्वासाठी या गोष्टी अत्यंत शुल्लक आहेत. एकत्र येणं, एकत्र राहणं यात फार कठीण गोष्ट वाटत नाही. विषय फक्त इच्छेचा आहे, कारण हा माझ्या एकट्याचा विषय नाही. माझं म्हणणं आहे की सर्व राजकीय पक्षातील सर्व मराठी माणसांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा.” असं राज ठाकरे म्हणाले होते. २० एप्रिलला ही मुलाखत समोर आली होती. त्यानंतर उद्धव ठाकरेंनीही सकारात्मक प्रतिसाद दिला होता. आता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का?

### या आमच्या अटी आहेत

यावर प्रकाश महाजन यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी या प्रश्नावर भाष्य केलं आहे. मला एका उर्दू गझलची ओळ आठवते आहे. तू ने एक बात कही लाखो फसाने निकले. राज ठाकरेंनी महेश मांजरेकरांना मुलाखत देताना एक ते दोन वाक्यं बोलले. त्यावर लोकांनी स्वप्नं बघायला सुरुवात केली. संजय राऊतसारखे लोक तर आम्हाला त्यांचे बटिक समजू लागले आहेत. तुम्ही त्यांच्याशी बोलायचं नाही, त्यांच्याशी बोलायचं नाही. या आमच्या अटी आहेत, त्या अटी आहेत. खरं तर संजय राऊतला समजलं पाहिजे की राज ठाकरे हे कुठल्याही अटीत किंवा चौकटीत बसणारी व्यक्ती नाही.

# पडळकर यांच्या मिरवणुकीत बिश्नोईचे फलक

## गुंडाचे उदात्तीकरण सहन केले जाणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस





।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नाशिकमधील मिरवणुकीत कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचे फलक झळकविण्यात आले होते. या प्रकाराची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. पुण्यात माध्यमांशी बोलत असताना याबाबतचा प्रश्न फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, “आमदार गोपीचंद पडळकर यांच्याशी याबाबत बोलणे झाले असून पडळकर यांनी पोलिसांना याबाबतची माहिती द्यावी, असे सांगितले आहे.**

या प्रकारावर कठोर कारवाई करण्यास सांगितले आहे. लॉरेन्स बिश्नोई सारख्या गुंडाचे उदात्तीकरण सहन केले जाणार नाही. ज्यांनी फलक झळकवले त्यांच्यावर कारवाई होईलच. स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आलेल्या मुदतीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, निवडणूक आयोगाने निवडणुकीची तयारी सुरू केलेली आहे. आम्ही वेळेत या निवडणुका घेण्याचा प्रयत्न करू. ज्या भागात पावसाचा जोर असेल त्या भागात निवडणूक काही दिवसांसाठी पुढे ढकलण्याची विनंती करू. याबाबत सरकार आणि निवडणूक आयोग योग्य तो समन्वय राखेल. पण वेळेत निवडणुका पूर्ण झाल्याच पाहिजेत, असा आमचा प्रयत्न आहे.महापालिकेच्या निवडणुकांना महायुती म्हणूनच सामोरे जाणार आहेत.

अपवादात्मक परिस्थितीत काही ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढवली जाईल. शेवटी ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. तरी एकमेकांवर टीका न करता आम्ही चांगली स्पर्धा करू. कार्यकर्ते अनेक वर्ष प्रभागात काम करतात, त्यांना संधी द्यायला हवी. निवडणूकपूर्व वेगळी लढत झाली तरी निवडणुकीनंतर निश्चितच युती होईल”, असेही ते यावेळी म्हणाले.

पहलगामचा हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर नंतर चित्रपट सृष्टी आणि महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांनी पाकिस्तान, तुर्किये आणि अझरबैजानशी व्यापार करण्यावर बहिष्कार घातला आहे. याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्यांनी बहिष्काराचा निर्णय घेतला, त्या सर्वांना मी शुभेच्छा देतो. राष्ट्र प्रथम ही आपल्या सर्वांची भूमिका असली पाहिजे. पहलगाममध्ये आपल्या लोकांना अतिशय क्रूर पद्धतीने मारले गेले. अशी क्रूरता करणारा देश आणि त्याला साथ देणाऱ्या देशांनाही धडा शिकविण्याची गरज आहे.

### राष्ट्र प्रथम ही आपल्या सर्वांची भूमिका

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, “लोकांनी जर स्वतःहून राष्ट्र प्रथम ही भावना नजरेसमोर ठेवून काही कृती केली असेल तर मी त्यांचे स्वागत करतो.” याबरोबरच तुर्कियेशी व्यापार तोडल्यामुळे पुण्यातील व्यापाऱ्यांना पाकिस्तानातून धमकी मिळाली आहे, असा प्रश्न माध्यमांनी विचारला असता फडणवीस म्हणाले की, तुर्कियेच्या मालावर ज्यांनी बहिष्कार टाकला, त्या व्यापाऱ्यांचे अभिनंदन. पहलगामवरील हल्ला फक्त भारतावरच नाही तर तो मानवतेवर झालेला मोठा हल्ला होता. मानवतेच्या हल्लेखोरांना नाकारणारे आमचे व्यापारी अभिनंदनास प्राप्त आहेत. त्यांना काळजी करण्याची गरज नाही.पाकिस्तानात घुसून पाकिस्तान उध्वस्त करणारा आपला देश आहे. आता तर न्यूयॉर्क टाइम्सने सॅटेलाइट इमेजसहीत पाकिस्तानचे सत्य बाहेर काढले आहे. ते भारताला नखही लावू शकले नाहीत.

# पाकिस्तान जिथे असतो, तेथे भिकाऱ्यांची रांग!

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचा घणाघाती हल्ला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सशस्त्र दलांच्या सुरक्षा आणि लढाऊ तयारीचा आढावा घेण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह गुरुवारी जम्मू आणि काश्मीरमध्ये होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्ड्यांवर 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केल्यानंतर संरक्षणमंत्र्यांचा हा जम्मू आणि काश्मीरचा पहिलाच दौरा होता.**



यावेळी श्रीनगरच्या बदामी बाग छावणीत राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला चांगलेच फटकारले आहे. पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितीवर कडक टीका करताना, राजनाथ सिंह यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वारंवार घेतलेल्या कर्जाचीही खिल्ली उडवली.राजनाथ सिंह म्हणाले की,"पाकिस्तानबद्दल, मी तुम्हाला काय सांगू? भीक मागण्याच्या अज्ञानामुळे तो देश अशा स्थितीत पोहोचला आहे की, पाकिस्तान जिथे उभा राहतो, तिथूनच भिकाऱ्यांची रांग सुरू होते."तुम्ही ऐकले असेलच की, ते पुन्हा एकदा कर्ज मागण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे गेले. दुसरीकडे, आज आपला देश अशा देशांच्या श्रेणीत येतो जो आंतरराष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडेला कर्ज देतो, जेणेकरून ते गरीब देशांना कर्ज देऊ शकेल," असे सिंह म्हणाले. राजनाथ सिंह यांनी बदामी बाग छावणीत सांगितले की,"अशा प्रतिकूल परिस्थितीत तुमच्याशी भेटून मला अभिमान वाटत आहे. पंतप्रधानांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली ऑपरेशन सिंदूर दरम्यान तुम्ही सर्वांनी जे काही केले त्याचा संपूर्ण देशाला अभिमान आहे."ते पुढे म्हणाले की, "संपूर्ण जगाला भारताबद्दल माहिती आहे की, आपण नेहमीच शांततेला प्राधान्य दिले आहे. आपण सहसा कधीही युद्धाचे समर्थक नव्हतो परंतु जेव्हा परिस्थिती इतकी भयानक होते, जेव्हा देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला होतो तेव्हा प्रत्युत्तर देणे आवश्यक असते."संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, "आम्ही आपले सैन्य प्रत्येक परिस्थितीसाठी सज्ज असल्याची खात्री केली आहे. यासाठी, आपल्या सैन्याला सर्वोत्तम आणि जागतिक दर्जाची उपकरणे पुरवत आहोत. आज भारतात आधुनिक रायफल्स, क्षेपणास्त्र संरक्षण ढाल आणि ड्रोन यांसारखी अनेक नवीन पिढीची उपकरणे वेगाने तयार केली जात आहेत. याशिवाय, तुम्ही सर्वजण सीमावर्ती भागात आम्ही केलेले काम पाहत असाल. आज एलएसी आणि एलओसीवर जी कनेक्टिव्हिटी आहे यावेळी श्रीनगरच्या बदामी बाग छावणीत राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला चांगलेच फटकारले आहे. पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितीवर कडक टीका करताना, राजनाथ सिंह यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वारंवार घेतलेल्या कर्जाचीही खिल्ली उडवली.राजनाथ सिंह म्हणाले की,"पाकिस्तानबद्दल, मी तुम्हाला काय सांगू? भीक मागण्याच्या अज्ञानामुळे तो देश अशा स्थितीत पोहोचला आहे की, पाकिस्तान जिथे उभा राहतो, तिथूनच भिकाऱ्यांची रांग सुरू होते."तुम्ही ऐकले असेलच की, ते पुन्हा एकदा कर्ज मागण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे गेले. दुसरीकडे, आज आपला देश अशा देशांच्या श्रेणीत येतो जो आंतरराष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडेला कर्ज देतो, जेणेकरून ते गरीब देशांना कर्ज देऊ शकेल," असे सिंह म्हणाले. राजनाथ सिंह यांनी बदामी बाग छावणीत सांगितले की,"अशा प्रतिकूल परिस्थितीत तुमच्याशी भेटून मला अभिमान वाटत आहे. पंतप्रधानांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली ऑपरेशन सिंदूर दरम्यान तुम्ही सर्वांनी जे काही केले त्याचा संपूर्ण देशाला अभिमान आहे.

### भारतात आधुनिक रायफल्स

"ते पुढे म्हणाले की, "संपूर्ण जगाला भारताबद्दल माहिती आहे की, आपण नेहमीच शांततेला प्राधान्य दिले आहे. आपण सहसा कधीही युद्धाचे समर्थक नव्हतो परंतु जेव्हा परिस्थिती इतकी भयानक होते, जेव्हा देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला होतो तेव्हा प्रत्युत्तर देणे आवश्यक असते."संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, "आम्ही आपले सैन्य प्रत्येक परिस्थितीसाठी सज्ज असल्याची खात्री केली आहे. यासाठी, आपल्या सैन्याला सर्वोत्तम आणि जागतिक दर्जाची उपकरणे पुरवत आहोत. आज भारतात आधुनिक रायफल्स, क्षेपणास्त्र संरक्षण ढाल आणि ड्रोन यांसारखी अनेक नवीन पिढीची उपकरणे वेगाने तयार केली जात आहेत.

# भीतीपोटीच मोदींकडून जातनिहाय जनगणनेस मान्यता

## वर्षअखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणुका : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देशातील वंचित लोकसंख्येच्या भीतीपोटीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणनेस मान्यता दिली, असा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. राहुल यांनी बिहारमधील दरभंगा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांशी संवाद कार्यक्रमादरम्यान ही टिप्पणी केली. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने त्यांना कार्यक्रमस्थळी पोहोचण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी ठरला.**



'माझी गाडी (मिथिला विद्यापीठाच्या) प्रवेशद्वारासमोर थांबली होती. पण मी हार मानली नाही. मी बाहेर पडलो आणि पायी येथे पोहोचण्यासाठी एक वळणावळणाचा मार्ग निवडला', असे राहुल म्हणाले. ते मिथिला विद्यापीठाच्या आंबेडकर सभागृहात विद्यार्थ्यांना संबोधित करीत होते. वर्षअखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होत असून, त्या पार्श्वभूमीवर त्यांनी 'शिक्षा न्याय संवाद' हा सार्वजनिक संवाद कार्यक्रम सुरू केला आहे.केंद्र सरकार अंबानी, अदानी आणि त्यांच्यासारख्या लोकांच्या हिताचे काम करते. ही व्यवस्था पाच टक्के लोकसंख्येच्या हितासाठी काम करत आहे. दलित, ओबीसी आणि आदिवासींचेही ऐकत नाही; मग ते सरकार असो, कॉर्पोरेट जगत किंवा माध्यम समूह असो, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात काँग्रेसला तीन खासदारांचे बळ असल्याने जातनिहाय जनगणनेच्या काँग्रेसच्या मागणीचे श्रेय पदरात पडावे म्हणून राहुल गांधी यांच्या उपस्थितीमध्ये जालना येथे एक मेळावा घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. मे अखेरपर्यंत हा मेळावा घेण्याविषयी काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याबरोबर बोलणी झाली आहेत. खासदार कल्याण काळे यांनी या वृत्तास दुजोरा दिला. या कार्यक्रमास राहुल गांधी यांनी यावे, असेही प्रयत्न केले जात आहेत.'माझी गाडी (मिथिला विद्यापीठाच्या) प्रवेशद्वारासमोर थांबली होती. पण मी हार मानली नाही.

### वळणावळणाचा मार्ग निवडला

मी बाहेर पडलो आणि पायी येथे पोहोचण्यासाठी एक वळणावळणाचा मार्ग निवडला', असे राहुल म्हणाले. ते मिथिला विद्यापीठाच्या आंबेडकर सभागृहात विद्यार्थ्यांना संबोधित करीत होते. वर्षअखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होत असून, त्या पार्श्वभूमीवर त्यांनी 'शिक्षा न्याय संवाद' हा सार्वजनिक संवाद कार्यक्रम सुरू केला आहे.केंद्र सरकार अंबानी, अदानी आणि त्यांच्यासारख्या लोकांच्या हिताचे काम करते. ही व्यवस्था पाच टक्के लोकसंख्येच्या हितासाठी काम करत आहे. दलित, ओबीसी आणि आदिवासींचेही ऐकत नाही; मग ते सरकार असो, कॉर्पोरेट जगत किंवा माध्यम समूह असो, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

# म्हणून मी गोविंदांबरोबर राहतेय

बॉलीवूडचा हीरो नं. १ म्हणजेच अभिनेता गोविंदा मागील काही महिन्यांपासून सातत्याने चर्चेत येत आहे. लग्नाच्या ३७ वर्षांनंतर गोविंदा पत्नी सुनीता आहुजा यांच्याबरोबर घटस्फोट घेणार असल्याच्या बातम्या वाऱ्यासारख्या पसरत होत्या. परंतु, य ा सगळ्या अफवा असल्याचं म्हणत गोविंदाची पत्नी सुनीता यांनी त्या बातम्यांचं खंडन केलं होतं. तसेच त्यांनी ट्रोल करणाऱ्यांनादेखील चांगलंच सुनावलं. गोविंदा आणि सुनीता यांनी आतापर्यंत याबद्दल काहीही सांगितलं



नसलं तरी, अलीकडच्या एका मुलाखतीत सुनीता यांनी काही गुपितं उघड केली आहेत.डेक्कन टॉक्स विथ आसिफला दिलेल्या मुलाखतीत सुनीता आहुजा यांनी पहिल्यांदाच त्यांच्या नात्याची स्थिती सांगितली. त्या म्हणाल्या, “कोणाची तरी त्यांच्या नात्याला वाईट नजर लागली आहे. कोणीही माझ्या पतीला माझ्यापासून हिरावून घेऊ शकत नाही”. सुनीता आणि गोविंदाचं लग्न एखाद्या चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नव्हतं. एकीकडे गोविंदा बॉलीवूडमध्ये आपली ओळख निर्माण करत असताना, दुसरीकडे सुनीता यांच्या कुटुंबाला हे नातं मान्य नव्हते. विशेषतः त्यांचे वडील या नात्याला तीव्र विरोध करीत होते. माझ्या वडिलांना कधीच वाटत नव्हतं की, मी गोविंदाशी लग्न करावं. ते माझ्या लग्नालाही उपस्थित राहिले नाहीत. चित्रपटसृष्टीत जीवन कसं असतं हे त्यांना माहीत होतं.

# ‘या’ व्यक्तीने अभिनेत्री व्हायला भाग पाडलेलं

अभिनेत्री म्हणून करिअरची सुरुवात करणारी ट्विंकल खन्ना आता एक निर्माती आणि लेखिकादेखील आहे. अभिनेत्रीची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि सर्वांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ट्विंकलने अलीकडेच सांगितले की, तिने बॉलीवूडमध्ये प्रवेश कुटुंबाच्या अपेक्षा होत्या म्हणून केला होता.दिव्या जैनशी बोलताना अभिनेत्री म्हणाली होती, ‘इथल्या अनेक लोकांप्रमाणेच मलाही वाटतं की मुलेही तेच करतात, जे त्यांचे पालक करतात. जर कोणाचे मिठाईचे दुकान असेल तर तुम्ही मिठाई विक्रेता बनता. हे इतके सोपे आहे. माझ्या अभिनय कारकिर्दीबद्दल माझे आई-वडील उत्सुक होते. मी सीए प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केला होता, कारण मला तेच करायचे होते. माझ्या आईने मला सांगितले की, तू अभिनेत्री होण्याची हीच योग्य वेळ आहे आणि नंतर तू जे काही करायचे ते करू शकतेस.” ट्विंकलची चित्रपट कारकीर्द जास्त काळ टिकली नाही, तिचे अनेक चित्रपट फ्लॉप ठरले. तिने सांगितले की, यामुळे तिने तिच्या आईलाही टोमणे मारले होते.ट्विंकल म्हणाली होती, ‘तुला माहिती आहे, तू मला जबरदस्ती केलीस.’ तेव्हा मला लेखक म्हणून यशस्वी कारकीर्द घडवता आली असती. मग आई म्हणाली, “बरं आता तू काय करू शकतेस?”दरम्यान, ट्विंकल म्हणाली की पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की ते त्यांची स्वप्ने मुलांवर लादू शकत नाहीत. मला वाटतं की एक आई म्हणून, आपल्या महत्त्वाकांक्षा आणि कल्पना बऱ्याचदा आपल्या मुलांपर्यंत पोहोचतात, पण हे करू नये. तुम्ही तुमच्या मुलाकडे पाहा, त्याची ताकद आणि कौशल्ये काय आहेत ते पाहा, यामुळे त्यांना हवे तसे करता येईल. अक्षय कुमार आणि ट्विंकल या दोघांनीही अनेक वर्षे एकमेकांना डेट केले. २००१ मध्ये त्यांचे लग्न झाले. या जोडप्याला आरव आणि नितारा ही दोन मुले आहेत. अक्षय आणि ट्विंकल यांनी १९९९ मध्ये ‘इंटरनॅशनल’, ‘खिलाडी’ आणि ‘झुल्मी’सारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले होते. ट्विंकल अनेकदा सोशल मीडियावर तिच्या लग्नाबद्दल मजेदार पोस्ट शेअर करत असते.अभिनेत्री म्हणून करिअरची सुरुवात करणारी ट्विंकल खन्ना आता एक निर्माती आणि लेखिकादेखील आहे. अभिनेत्रीची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि सर्वांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ट्विंकलने अलीकडेच सांगितले की, तिने बॉलीवूडमध्ये प्रवेश कुटुंबाच्या अपेक्षा होत्या म्हणून केला होता.दिव्या जैनशी बोलताना अभिनेत्री म्हणाली होती, ‘इथल्या अनेक लोकांप्रमाणेच मलाही वाटतं की मुलेही तेच करतात, जे त्यांचे पालक करतात. जर कोणाचे मिठाईचे दुकान असेल तर



तुम्ही मिठाई विक्रेता बनता. हे इतके सोपे आहे. माझ्या अभिनय कारकिर्दीबद्दल माझे आई-वडील उत्सुक होते. मी सीए प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केला होता, कारण मला तेच करायचे होते. माझ्या आईने मला सांगितले की, तू अभिनेत्री होण्याची हीच योग्य वेळ आहे आणि नंतर तू जे काही करायचे ते करू शकतेस.” ट्विंकलची चित्रपट कारकीर्द जास्त काळ टिकली नाही, तिचे अनेक चित्रपट फ्लॉप ठरले. तिने सांगितले की, यामुळे तिने तिच्या आईलाही टोमणे मारले होते.ट्विंकल म्हणाली होती, ‘तुला माहिती आहे, तू मला जबरदस्ती केलीस.’ तेव्हा मला लेखक म्हणून यशस्वी कारकीर्द घडवता आली असती. मग आई म्हणाली, “बरं आता तू काय करू शकतेस?”दरम्यान, ट्विंकल म्हणाली की पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की ते त्यांची स्वप्ने मुलांवर लादू शकत नाहीत. मला वाटतं की एक आई म्हणून, आपल्या महत्त्वाकांक्षा आणि कल्पना बऱ्याचदा आपल्या मुलांपर्यंत पोहोचतात, पण हे करू नये.अभिनेत्री म्हणून करिअरची सुरुवात करणारी ट्विंकल खन्ना आता एक निर्माती आणि लेखिकादेखील आहे. अभिनेत्रीची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि सर्वांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

# ‘नो एंट्री 2’मधून दिलजीत दोसांझची माघार

बोनी कपूर यांच्या बहुप्रतीक्षित ड्रीम प्रोजेक्ट ‘नो एंट्री’च्या सीक्वेलबद्दल काही काळापासून बरीच चर्चा आहे. अनीस बज्मी दिग्दर्शित या चित्रपटासाठी वरुण धवन, अर्जुन कपूर व दिलजीत दोसांझ यांची नावे पुढे आली होती; परंतु आता बातमी येत आहे की, दिलजीत या प्रोजेक्टमधून बाहेर पडला आहे. दिलजीत दोसांझचे चाहते त्याला ‘नो एंट्री २’ या कॉमेडी चित्रपटात पाहण्यासाठी खूप उत्सुक होते; पण आता त्याचे चाहते निराश झाले आहेत. कारण- गायक व अभिनेता दोसांझ या प्रोजेक्टमधून बाहेर पडत आहे.‘फिल्मफेअर’च्या रिपोर्टनुसार, दिलजीत दोसांझने ‘नो एंट्री २’पासून स्वतःला दूर केले आहे. असे म्हटले जात आहे की, तो या प्रोजेक्टबद्दल खूप उत्साहित होता आणि वरुण धवन-अर्जुन कपूरबरोबर काम करण्यासही तो आनंदी होता; परंतु चित्रपटाच्या क्रिएटिव्ह कल्पनेबद्दल त्याचे मत वेगळे होते. त्यामुळे क्रिएटिव्ह मतभेदांमुळे त्याने चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलजीत आणि चित्रपटाच्या टीममध्ये स्क्रिप्टबाबत अनेक वेळा चर्चा झाली; परंतु तो चित्रपटाच्या कंटेंटवर खूश नव्हता. असेही म्हटले जात आहे की, त्याला त्याचे पात्र मजबूत आणि स्क्रिप्ट चांगली हवी होती. परंतु, ते शक्य झाले नाही, तेव्हा त्याने चित्रपटाला निरोप देणेच योग्य मानले. आता सर्वांत मोठा प्रश्न असा निर्माण होतो की, दिलजीत गेल्यानंतर चित्रपटात त्याची जागा कोण घेईल. चित्रपटाचे निर्माते बोनी कपूर व दिग्दर्शक अनिस बज्मी यांनी अद्याप यावर कोणतेही अधिकृत विधान केलेले नसले तरी लवकरच त्याच्या जागी एखाद्या मोठ्या कलाकाराला साइन केले जाईल, असे मानले जाते.विशेष म्हणजे दिलजीत आणि वरुण ‘नो एंट्री २’मध्ये एकत्र दिसणार नसले तरी हे दोन्ही कलाकार सनी देओलबरोबर ‘बॉर्डर २’मध्ये काम करीत आहेत. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये खूप उत्साह आहे आणि असे मानले जाते की, हा वॉर ड्रामा मोठ्या पातळीवर बनवला जात आहेबोनी कपूर यांच्या बहुप्रतीक्षित ड्रीम प्रोजेक्ट ‘नो एंट्री’च्या सीक्वेलबद्दल काही काळापासून बरीच चर्चा आहे. अनीस बज्मी दिग्दर्शित या चित्रपटासाठी वरुण धवन, अर्जुन कपूर व दिलजीत दोसांझ यांची नावे पुढे आली होती; परंतु आता बातमी येत आहे की, दिलजीत या प्रोजेक्टमधून बाहेर पडला आहे. दिलजीत दोसांझचे चाहते त्याला ‘नो एंट्री २’ या कॉमेडी चित्रपटात पाहण्यासाठी खूप उत्सुक होते; पण आता त्याचे चाहते निराश झाले आहेत.

# कारागृहात रंगला क्रिकेटचा थरार!

## कैद्यांच्या 'जेल प्रीमियर लीग'चा व्हिडिओ व्हायरल

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतात सध्या आयपीएल २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. देशभरात नव्हे, तर जगभरात या स्पर्धेची चर्चा रंगते. मात्र, आयपीएल सुरू असताना आणखी एका क्रिकेट लीग स्पर्धेने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तुम्ही आतापर्यंत बऱ्याच क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धा पाहिल्या असतील. पण कधी जेल प्रीमियर लीग स्पर्धा ऐकलं होतं का? क्वचितच ऐकलं असेल, कारण याआधी असं काही घडलंच नव्हतं. या आगळ्या वेगळ्या स्पर्धेची सर्वत्र चर्चा रंगली आहे.**



एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला की, त्याला कायद्यानुसार शिक्षा दिली जाते. ही शिक्षा पूर्ण करण्यासाठी आरोपीला तुरूंगात ठेवलं जातं. काही आरोपी काही महिन्यांसाठी तुरूंगात शिक्षा भोगतात. तर काही आरोपींचं संपूर्ण आयुष्य तुरूंगात निघून जातं. आरोपी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट राहावे, म्हणून कारागृह प्रशासनाकडून वेगवेगळे उपक्रम राबवले जात असतात. मात्र, कैद्यांसाठी क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन आणि ते सुद्धा कारागृहातच? हे तुम्ही पहिल्यांदाच ऐकलं असेल. सोशल मीडियावर एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे. ज्यात काही कैदी कारागृहात क्रिकेट खेळताना दिसून येत आहेत. हा व्हिडिओ मथुरातील कारागृहातील आहे. कैद्यांना दोन गटांमध्ये विभागून दोन संघ तयार करण्यात आले. त्यानंतर दोन्ही संघांमध्ये क्रिकेटचा दमदार सामना रंगला. व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, कैदी मनसोक्त क्रिकेट खेळण्याचा आनंद घेताना दिसून येत आहेत. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओत तुम्ही पाहू शकता की, सामना झाल्यानंतर त्यांना सन्मानित देखील केलं जात आहे.

हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.हा व्हायरल होत असलेला व्हिडिओ ANI ने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवरून शेअर केला आहे. या व्हिडिओवर नेटकरी मजेशीर प्रतिक्रिया देताना दिसून येत आहेत. एका यूझरने कमेंट करत लिहिले की,"खरी मजा तर हे लोकं करत आहेत." तर आणखी एक यूझरने कमेंट करत लिहिले की,'जर कारागृहात अशी सोय असेल, मी देखील कारागृहात जायला तयार आहे." तर आणखी एका युझरने लिहिले," असं वाटतंय कारागृहात जावं लागेल.

" हा झाला मजेचा भाग,पण हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला की, त्याला कायद्यानुसार शिक्षा दिली जाते. ही शिक्षा पूर्ण करण्यासाठी आरोपीला तुरूंगात ठेवलं जातं. काही आरोपी काही महिन्यांसाठी तुरूंगात शिक्षा भोगतात. तर काही आरोपींचं संपूर्ण आयुष्य तुरूंगात निघून जातं. आरोपी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट राहावे, म्हणून कारागृह प्रशासनाकडून वेगवेगळे उपक्रम राबवले जात असतात. मात्र, कैद्यांसाठी क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन आणि ते सुद्धा कारागृहातच? हे तुम्ही पहिल्यांदाच ऐकलं असेल. सोशल मीडियावर एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे. ज्यात काही कैदी कारागृहात क्रिकेट खेळताना दिसून येत आहेत. हा व्हिडिओ मथुरातील कारागृहातील आहे. कैद्यांना दोन गटांमध्ये विभागून दोन संघ तयार करण्यात आले. त्यानंतर दोन्ही संघांमध्ये क्रिकेटचा दमदार सामना रंगला. कैदी मनसोक्त क्रिकेट खेळण्याचा आनंद घेताना दिसून येत आहेत.

### असं वाटतंय कारागृहात जावं लागेल

व्हायरल होत असलेल्या व्हिडिओत तुम्ही पाहू शकता की, सामना झाल्यानंतर त्यांना सन्मानित देखील केलं जात आहे. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.हा व्हायरल होत असलेला व्हिडिओ ANI ने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवरून शेअर केला आहे. या व्हिडिओवर नेटकरी मजेशीर प्रतिक्रिया देताना दिसून येत आहेत. एका यूझरने कमेंट करत लिहिले की,"खरी मजा तर हे लोकं करत आहेत." तर आणखी एक यूझरने कमेंट करत लिहिले की,'जर कारागृहात अशी सोय असेल, मी देखील कारागृहात जायला तयार आहे." तर आणखी एका युझरने लिहिले," असं वाटतंय कारागृहात जावं लागेल." हा झाला मजेचा भाग,पण हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.भारतात सध्या आयपीएल २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. देशभरात नव्हे, तर जगभरात या स्पर्धेची चर्चा रंगते. मात्र, आयपीएल सुरू असताना आणखी एका क्रिकेट लीग स्पर्धेने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तुम्ही आतापर्यंत बऱ्याच क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धा पाहिल्या असतील.

# गुजरात टायटन्सला मोठा धक्का

## बटलर स्पर्धेतून बाहेर पडणार; मेंडिसला संधी दिली जाऊ शकते

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ स्पर्धा शेवटच्या टप्प्यात येऊन पोहोचली आहे. या स्पर्धेतील ५८ सामने पूर्ण झाले आहेत. भारत आणि पाकिस्तानातील तणावाची स्थिती पाहता, ही स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.**



मात्र, सुधारीत वेळापत्रकानुसार, ही स्पर्धा १७ मेपासून सुरू होणार आहे. गुजरातचा संघ गुणतालिकेत सर्वाच्च स्थानी असून प्लेऑफमध्ये जाण्याचा सर्वात मोठा दावेदार आहे. दरम्यान या स्पर्धेतील दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांना सुरूवात होण्यापूर्वी गुजरात टायटन्सला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. संघातील प्रमुख फलंदाज जोस बटलर स्पर्धेतून बाहेर पडणार असल्याचं म्हटलं जात आहे.ठरलेल्या वेळापत्रकानुसार, आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना २५ मे रोजी होणार होता. मात्र, भारत-पाकिस्तानातील वाढता तणाव पाहता बीसीसीआयने ही स्पर्धा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. एक आठवड्याच्या विश्रांतीनंतर या स्पर्धेला पुन्हा एकदा सुरूवात होणार आहे. स्पर्धेतील फायनलचा सामना ३ मे रोजी खेळवला जाणार आहे.गुजरात टायटन्स संघाला ३ फलंदाजांनी स्पर्धेत टिकवून ठेवलं आहे.

सलामीला येणारे गिल आणि सुदर्शन आणि त्यानंतर जोस बटलर. या तिघांनी मिळून सर्व संघांची वाट लावली. गुजरातला प्ले ऑफ मध्ये जाण्याची सुवर्णसंधी आहे. मात्र, प्लेऑफच्या सामन्यांवेळी बटलर गुजरातकडून खेळू शकणार नाही. इंग्लंड आणि वेस्टइंडिज या दोन्ही संघांमध्ये २९ मे पासून मर्यादीत षटकांची मालिका रंगणार आहे. या मालिकेत बटलर इंग्लंडकडून खेळताना दिसून येऊ शकतो. त्यामुळे त्याला प्लेऑफचे सामने खेळता येणार नाही. गुजरातचा सध्याचा फॉर्म पाहता, हा संघ फायनलमध्येही प्रवेश करू शकतो.द वायरने दिलेल्या वृत्तानुसार, जोस बटलर स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर त्याच्या जागी श्रीलंकेचा धडाकेबाज फलंदाज कुसल मेंडिसला संघात संधी दिली जाऊ शकते. मेंडिस हा या हंगामात रिप्लेस होऊन आयपीएलमध्ये प्रवेश करणारा श्रीलंकेचा दुसरा खेळाडू ठरला आहे. यापूर्वी दासून शनाकाला आयपीएल खेळण्याची संधी मिळाली होती. त्याला ग्लेन फिलिप्सच्या जागी संधी दिली होती.विस्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो.

### स्पर्धेला 17 मे पासून सुरुवात

सध्या तो पाकिस्तान सुपर लीग स्पर्धा खेळून आला आहे. आयपीएलसह पीएसएल स्पर्धा देखील एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली आहे. या स्पर्धेला देखील १७ मे पासून सुरुवात होणार आहे. आता तो पाकिस्तान सुपर लीगचे उर्वरीत सामने खेळण्यासाठी पाकिस्तानात जाणार?

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
। दि. 18 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# राष्ट्रवादीतर्फे गाथा सन्मानाची-कर्तृत्ववान महिलांचा गुणगौरव!

## जागतिक महिला दिनानिमित्त शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षा प्रा कविता आल्हाट यांच्या वतीने "गाथा सन्मानाची" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपले अमूल्य योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला.**



सदर सन्मान सोहळा गोदावरी आंगण, बोऱ्हाडे वाडी, मोशी येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी केले. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या, विशेषतः परिचारिका, शिक्षिका, ब्युटीशियन, पोलीस कॉन्स्टेबल, तसेच इतर विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना शहर अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.महिलांसाठी विविध खेळांचे, कलागुणांचे प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.

### महिलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न...

राष्ट्रवादी काँग्रेस महिला सेलच्या प्रदेश अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदद पवार, प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या "गाथा सन्मानाची" या उपक्रमाद्वारे महिलांना प्रेरणा देण्याचा आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक करण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

# 'निर्भय कन्या' अभियानामधून

# महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय - डॉ. किर्ती धारवाडकर

## शिक्षण विश्व: एसबीपीआयएम मध्ये निर्भय कन्या अभियान संपन्न

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने एसबीपीआयएम येथे "निर्भय कन्या अभियान" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वरिष्ठ संबंध व्यवस्थापक दिपाली महाजन, सह प्रा.डॉ.काजल माहेश्वरी,डॉ.रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात 'इंट्रोडक्शन टू द वर्ल्ड ऑफ इन्व्हेस्टमेंट- एक गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम' या विषयावर दिपाली महाजन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यवस्थापक, व्यवस्थापकीय बँकिंग आणि राष्ट्रीय वितरण वाहिनीचा अवलंब करून विद्यार्थिनींना जीवनात स्वतंत्रता, वेळेची बचत आणि गुंतवणूक करून करिअर मध्ये स्थिरता कशी आणता येते. विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवस्थापन आणि विविध आर्थिक साधनांमधील गुंतवणुकीचे महत्त्व सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ. काजल माहेश्वरी यांनी 'वैयक्तिक सुरक्षा' या विषयावर मार्गदर्शन केले. वैयक्तिक सुरक्षा वाढविण्यासाठी लागणारी धोरणे, स्व-संरक्षण तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव विद्यार्थिनींना करून दिली. कोणत्याही परिस्थितींमध्ये सुरक्षित राहण्यासाठी काळजी कशी घ्यावी याची उदाहरणे दिली.

समारोप प्रसंगी डॉ. रूपाली कुदरे यांनी 'मानसिक आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मानसिक आरोग्य व्यवस्थापनाचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन तंत्र, जागरूकता, सकारात्मक विचार, स्वत:ची काळजी घेण्याच्या धोरणांवर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याच्या आव्हानांना ओळखण्याच्या आणि त्यांचा सामना करण्याच्या पद्धती समजून सांगितल्या. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी वक्त्यांना गुंतवणूक धोरणे,वैयक्तिक सुरक्षा उपाय आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रश्न विचारले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उत्कृष्ट कार्यक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा ₹ १३००/-
'C++' भाषा ₹ १३००/-
बेसिक जावा ₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/-
बेसिक टॅली ₹ १५००/-
एम.एस. ऑफिस ₹ १५००/-
कोरल ड्रॉ ₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

# रंग आणि लेखणीतून जगभरातील घडामोडींवर भाष्य!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेला प्रतिसाद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा मधून विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीवर भाष्य केले. जगभरातील विविध घडामोडी विद्यार्थ्यांनी रंग आणि लेखणीतून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थी आणि पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले .**




पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेत आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षी वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड मधील विविध महाविद्यालयांतील ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित पाहुणे डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. स्मृती पाठक, कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. सुप्रिया कुलकर्णी आणि एस. बी. पाटील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रावेतचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पोस्टर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुवर्णा शिंदे, अश्विनी साळवे, निबंध लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शेळके, प्रा. अमृता दीक्षित आणि वकृत्व स्पर्धेसाठी प्रा. स्वाती पाटील, प्रा. रोहित वरवंडकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. इशप्रीत कौर, सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र देसाई व आभार प्रा. सुषमा पिंपळखरे यांनी मानले.

विजेत्यां विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, रोख बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखेचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025–26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105



# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

